tukdi


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

**आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**

MCAER
कृषि परिषद

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

**ई-मेल :** edn_mcaer@rediffmail.com **दूरध्वनी :** (०२०) २५५३ ७६८८.
**वेबसाईट :** www.mcaer.org **फॅक्स :** (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/५१२/१७१४ दि. १६ जुलै,२०१४

प्रति,

कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी),
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ,
दापोली जि. रत्नागिरी

**विषयः- कै. राजाराम मराठे कृषी महाविद्यालय, फोंडाघाट या कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयास तुकडीवाढ मंजूर करण्याबाबत.**

संदर्भः- (१) कार्यालयाचे पत्र जा.क्र. मकृप/शिक्षण/प्र.क्र.१५१३ /१५३३/ २०१३, दि.१/८/२०१३
(२) शिक्षण संचालक, डॉ. बासाकोकृवि, दापोली यांचे पत्र जा.क्र. डॉबासाकोकृवि/ डिन्स-अ/ ४७९/७८१६/२०१३, दि.१९/८/२०१३

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली अंतर्गत ब्राम्हणेश्वर शैक्षणिक सामाजिक उन्नती मंडळ, फोंडाघाट या संस्थेच्या कै. राजाराम मराठे कृषी महाविद्यालय, फोंडाघाट हया महाविद्यालयास तुकडीवाढ मिळण्याबाबत संस्थेच्या अध्यक्षांनी विनंती केली होती. यासंदर्भात संदर्भ क्र. २ येथील दि. १९/८/२०१३ च्या पत्रान्वये कृषी विद्यापीठाकडून अहवाल प्राप्त झाला होता. तसेच यासंदर्भात मा.मंत्री (कृषी व पणन) तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांच्याकडे मान्यतेचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सबब, मा. मंत्री (कृषी) तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांनी महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम, १९८३ चे कलम १२ (३) (डी) मधील अधिकारान्वये सदर संस्थेच्या 'कै. राजाराम मराठे कृषी महाविद्यालय, फोंडाघाट' या कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयास तुकडीवाढ मंजूर करण्यास मान्यता दिली असून प्रवेश प्रक्रिया सुरु करण्याविषयी सूचित केले आहे.

सबब, सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून केंद्रीय पध्दतीने व प्रवेश माहिती पुस्तिका २०१४-१५ अनुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल.

आपल्या माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

**मा.महासंचालक**
**यांच्या मान्यतेने.**

१६/७/२०१४
**संचालक (शिक्षण)**

प्रत माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीकरीता अग्रेषित :-

(१) अध्यक्ष, ब्राम्हणेश्वर शैक्षणिक सामाजिक उन्नती मंडळ, फोंडाघाट, ता.कणकवली जि.सिंधुदुर्ग
(२) प्राचार्य, कै. राजाराम मराठे कृषी महाविद्यालय, फोंडाघाट, ता.कणकवली जि.सिंधुदुर्ग

प्रत माहितीकरीता :-

(१) मा. कुलगुरू, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली जि. रत्नागिरी
(२) मा. मंत्री (कृषी) तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.

२/- सदरील बाब कृपया मा. मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून द्यावी.